प्रासनु २०२५
५१७-४८
१४२०

भावगीत — प्रोबनात

तुझ्या मुखावर नित्य पाहते समर्पिताचे झुलें,
कशास घेउ ओंजळीत मी प्राजक्ताची फुलें ? ॥धृ०॥

दैवाने जे मला लाभले अकल्पित आगळे
तुझ्या सोबती सजले जीवन जीवनाहुनि वेगळे
सहवासातून दरवळणारा मुग्ध केवडा खुळे -
कशास घेउ ओंजळीत मी प्राजक्ताची फुलें ?... १

कुणाकुणाला कुठवर सांगू नवरंगांच्या छटा
आकाशाच्या नाभीतील तू, इन्द्रधनु अेकटा
आषाढावे, श्रावण गावे, स्वच्छंदी पाउलें - ल्यावे
कशास घेउ ओंजळीत मी प्राजक्ताची फुलें ?.. २

आयुष्याच्या ऐलतीरावर तूच उधळल्या राशी
पैलतीराचा सोस ~~कशाला~~ नको रे तुझ्यात गंगा-काशी नसे रे
अतर्क्य आणि अगम्य सारे तुझ्यासवे भेटले -
कशास घेउ ओंजळीत मी प्राजक्ताची फुलें ?.. ३

५.११.८२

सहदेव मखामले.